**एस.सी.सी.क्रं. ८०४/२०२२**
<u>नि. १८</u>

**सरकारतर्फे सा.क्र. ३**

**शपथेवर**

माझे नांव : श्री. अशोक गंगाराम गव्हाणे,
वय : ४९ वर्षे, धंदा : काही नाही,
राहणार : म्हसले, ता.नेवासा, जि.अहमदनगर,

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** –

१. जखमी ठकाजी गव्हाणे हे माझे बंधू आहेत. त्यांचा अपघात १०.०८.२०२२ रोजी दुपारी ०५.३० च्या दरम्यान पिचडगांव फाटा, मुकींदपूर ते अ. नगर रस्त्यावर झाला. घटनेच्यावेळी मी व माझा पुतण्या कैलास गव्हाणे मोटारसायकलचा टायर टाकण्यासाठी पिचडगांव फाटयाला आलो होतो. त्यावेळी माझा बंधू ठकाजी गव्हाणे टी.व्ही.एस गाडीवरून पिचडगांव ते म्हसले या दिशेने चालला होता. त्यावेळी मी व माझा पुतण्या आमच्या मोटारसायकलवरून त्याच्या पाठीमागे १० ते १५ फुट अंतरावर होतो. त्यावेळी माइया भावाने वळण्यासाठी हात दाखवला होता. भावाच्या मोटारसायकलच्या मागे स्वीफ्ट डीझायर गाडी होती. त्या गाडीने भावाच्या मोटारसायकला मागुन धडक दिली. त्या स्वीफ्ट डीझायर गाडीचा नंबर ७००७ असा होता. त्या गाडीचा चालक दोन ते तीन मिनीटे तेथे थांबला होता. परंतु आम्ही आमच्या भावाला उचलत असताना तो तेथुन निघुन गेला. माइया भावाला तोंडाला, हातापायाला जबर मार लागला होता. आम्ही त्याला श्वास हॉस्पीटल, नेवासा फाटा येथे दाखल केले. तेथुन त्याला विळदघाट येथील विखे पाटीस येथील हॉस्पीटल मध्ये ॲडमीट केले. त्यानंतर त्याला नगर येथील पंडीत हॉस्पीटल येथे ॲडमीट केले.पं डीत हॉस्पीटल मध्ये माइया भावावर ७–८ दिवस उपचार केले. ज्या गाडीने माइया भावाला धडक दिली त्या चालकाचे नाव मला समजले होते. त्याचे नाव सखाराम भुमरे असे आहे. त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आजरोजी न्यायालयात उपस्थित नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. एस. एस. कोतकर यांचेमार्फत उलटतपास सुरू–</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी ज्या मोटारसायकलचा टायर बदलल्याण्यासाठी पुतण्यासोबत गेलो होतो ती मोटारसायकल पुतण्याच्या मालकीची नव्हती. माझ्या मोटारसायकलचे टायर बदलण्यासाठी मी गेलो होतो पुतण्याच्या नाही. घटनेच्या वेळी माझ्या भावाचे वय अंदाजे ६० वर्ष होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझ्या भावाकडे मोटारसायकल चालवण्याचा परवाना नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पिचडगाव फाटा येथे चौफुला व हायवे असल्यामुळे तेथे कायम रहदारी असते. माझ्या भावाने वळण्यापुर्वी हाताने इशारा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाच्या मोटारसायकलमध्ये १० ते १५ फुट अंतर होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघात मी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघात झाल्यानंतर गेल्यामुळे मी गाडीचा क्रमांक पाहिला नव्हता. गाडीचा संपुर्ण क्रमांक मी सांगु शकत नाही.अपघात घडला त्यावेळी गाडी चालकाचे नाव मला माहिती नव्हते मला ते नंतर समजले. मी जबाब द्यायला पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, भावाला अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
स्वाक्षरीत/—

दि. ०६/११/२०२५

**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा